# अट्टल चोरटे पोलीस स्टेशन वर्धा शहर येथील गुन्हे प्रकटीकरण पथकाचे जाळ्यात

फिर्यादी श्री हनुमंत वैद्य, रा. समता नगर, वर्धा याचे घराचे बांधकाम समता नगर, वर्धा येथे सुरू असुन बांधकामाकरीता लागणारा लोहा फिर्यादी यांनी त्यांचे घराचे बाजुला आणुण ठेवला होता . दिनांक १९-०४-२०२२ चे रात्र दरम्यान कोणीतरी अज्ञात चोरटयाने बांधकामचा १५० किलो लोहा किंमत १२,०००/- रू. चा चोरून नेल्याबाबत फिर्यादी यांनी पो.स्टे. वर्धा शहर येथे दिलेल्या रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वर्धा शहर येथे अप. क्र. ६१३/२०२२ कलम ३७९ भांदवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

तसेच फिर्यादी श्री सतिष कांबळे, रा. भिमनगर, वर्धा हे लोटे कॉम्प्ले क्स, भिमनगर, वर्धा येथे राहत असुन त्यांनी त्यांचे मालकीची हिरो होन्डा पॅ शन मोटारसायकल क्र. एमएच-३२/एम-११२० ही कॉम्प्लेक्सच्या आत वि हिरीजवळ लॉक करून उभी करून ठेवली होती. सदर मोटारसायकल कोणीतरी अज्ञात चोरटयाने दिनांक १६-०४-२०२२ चे रात्र दरम्यान चोरून नेल्याबाबत फिर्यादी यांनी पो.स्टे. वर्धा शहर येथे दिलेल्या लेखी तक्रारीवरून अप .क्र. ६१२/२०२२ कलम ३७९ भांदवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

तसेच फिर्यादी श्री अर्पण फुलकर, रा. इंदीरा नगर, वर्धा हे दि.१८-०४-२०२२ रोजी रात्री ०९.०० वा. त्यांचे मालकीची बजाज पल्सर २२० मोटारसायकल क्रमांक एमएच-४०/बिए-७९११ घेवनु दुर्गा टॉकीज, वर्धा येथे सिनेमा पाहण्याकरीता गेले व आपले मालकीची मोटारसायकल ही दुर्गा टॉकीज, समोर लॉक करीता उभी ठेवली होती. सदर मोटारसायकल कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेल्याने फिर्यादी यांनी

दिलेल्या तोंडी रिपोर्टवरून पोलीस स्टेशन वर्धा शहर येथे अप क्रमांक ५९६/२०२२ कलम ३७९ भांदवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर तिन्ही गुन्हे तपासावर असतांना मुखबिरकडुन मिळालेल्या गोपनीय माहितीवरून आरोपी नामे १) ऋषीकेष उर्फ अलबट गजानन गजभिये, वय २१ वर्ष, रा. भिमनगर , वर्धा व २) प्रणय मधुकर जांभुळे , रा. बोरगाव मेघे , वर्धा यांचे ताब्यातुन अप. क्र. ६१३/२०२२ कलम ३७९ भादं वि मधील चोरी केलेला १५० किलो लोहा सळाखी किंमत १२,०००/- रू. च्या जप्त करून सदरचा गुन्हा उघकीस आणला.

तसेच आरोपी नामे ऋषीकेष उर्फ अलबट गजानन गजभिये , वय २१ वर्ष, रा. भिमनगर, वर्धा याला वर्धा शहरातील मो टारसायकल चोरीबाबत विचारपुस केली असता त्याने दिलेल्या कबुलीवरून त्याचे ताब्यातुन हिरो होन्डा पॅ शन मोटारसायकल क्रमांक एमएच-३२/एम-११२० किंमत १२,०००/- रू. तसेच बजाज पल्सर २२० मोटारसायकल क्रमांक एमएच-४०/बिए-७९११ किंमत ५०,०००/- रू. अश्या दोन दुचाकी जप्त करण्यात आल्या आहे.

सदर आरोपींता कडुन पो.स्टे. वर्धा शहर अप.क्र. ६१३/२०२२ कलम ३७९ भांदवि, अप. क्र. ६१२/२०२२ कलम ३७९ भांदवि व अप. क्र. ५९६/२०२२ कलम ३७९ भांदवि असे तिन गुन्हे उघडकीस आणले.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री प्रशांत होळकर, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री यशवंत सोळंके, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, वर्धा श्री पियुष जगताप यांचे मार्ग दर्शनात पोलीस निरीक्षक श्री सत्यवीर बंडीवार यांचे निर्दे शानुसार पोउपनि. सुरेश दुर्गे व गुन्हे प्रकटी करण पथकाचे पोलीस अंमलदार सचिन इंगोले, सुभाष गावड, सुनिल चोपडे , दिपक जंगले , राधाकिसन घुगे , राजेंद्र ढगे , पवन निलेकर व राहुन भोयर यांनी केली.